**<u>प्रतिवादी तर्फे अतिरिक्त सरतपास श्री. डी. डी. आजगेकर वकील.</u>**

**१६.** आता मला दावा मिळकतीच्या फिल्ड पाडणेसाठी भूमी अभिलेख आजरा यांचेकडून दि. २०/०९/१९९७ रोजी आलेल्या नोटीसीची मूळ प्रत दाखवली तिला नि. क्र. ८८ देणेत आली. आता मला वादीच्या वकीलांना दि. ०७/०७/२०१४ रोजी दिलेल्या नोटीस उत्तराची व ती पाठविल्याची आणी त्यांना भेटल्याची पोष्टाच्या पावत्या दाखविल्या त्यानां नि ८९ ते ९१ देण्यात येतात. आता मला दि.२३/०४/२०१४ रोजी वादीच्या विरोधात आजरा पोलीसांकडे दिलेल्या तक्रारीची प्रत दाखविली तिला नि. ९२ देण्यात येते. आता मला जनता सहकारी बँकेन कर्ज मंजूर केल्याबाबत दिलेला दाखला दाखवला, त्याला **नि. क्र. ९३** देण्यात येतो. आता मला दि. ०३.१०.२००५ रोजी केलेल्या बँक बोजा रद्द नोंदीचा दाखला दाखवला, त्याला **नि. क्र. ९४** देण्यात येतो. आता मला माझ्या नव्या घराच्या प्रवेशाबाबत छापलेली निमंत्रण पत्रीका व तिचा लिफाफा दाखवला, त्याला **वस्तू क्र. अ** देण्यात येतो. आता मला मी मागणी केलेल्या बांधकाम परवाना अर्जाबाबत दिलेल्या ठरावाची प्रत दाखविली, तिला **नि. क्र. ९५** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>वादी तर्फे उलटतपास श्री. एस. एस. निकम वकील यांचे मार्फत.</u>**

**१७.** पुर्वी माझ्या मिळकतीसह दावा मिळकतीचा एकत्रीत सर्वे क्र. १७९ होता. हे म्हणणे खरे नाही की, तो संपुर्ण सर्वे क्रमांक वादीच्या कुटुंबियांचा होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत सि.स.क्र. १७९/अ ही वादींची आणि सि.स.क्र. १७९/ब माझ्या मालकीची आहे. माझा वादींच्या मिळकतीशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मिळकतीशी वादींचा कोणताही संबंध नाही. मला सदर मिळकतींची सिटी सर्वे नोंद होण्यापूर्वी दोन त्यामध्ये दोन जाप्त्यांचे एक घर असल्याची माहिती नाही.

**१८.** आता मला दाखविलेल्या सि.स.क्र. १७९/अ व ब च्या नकाशा प्रमाणे वादींच्या बांधकामाचे क्षेत्र जास्त असून माझे कमी आहे. साक्षीदाराला उलट तपासा दरम्यान सदर सार्वजनिक नकाशा दाखविल्यामुळे त्याला **नि. क्र. ९६** देण्यात येतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या नकाशात दाखविल्या प्रमाणे उर्वरीत खुल्या जागेत आमच्या शौचालयाचे बांधकाम आहे. माझ्या व वादीच्या जुन्या घरांच्या बांधकामांच्या पाठीमागे खुली जागा आहे. नि. क्र. ९६

वरील नकाशा प्रमाणे आमच्यातील बांधकामाची सध्या परिस्थिती आहे.

**१९**. आजरा शहरात १९७४ साली सिटी सर्वे लागू झाला होता. त्यावेळी आमच्या मिळकतींचा एकत्रीत नकाशा तयार करण्यात आला होता. मी दि. २४.०७.१९९६ रोजी माझी मिळकत खरेदी केली होती. नि. क्र. ९६ मधील नकाशात दाखविलेली आमच्या दोघांच्या जुन्या घराच्या जागेमधील भिंत आजदेखील आहे. आम्ही दोघेही तिला 'सामाईक चालीची भिंत' म्हणतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर भिंतीबाबत मी जागा खरेदी केल्यापासून आजपर्यंत वादीने कोणतेही बांधकाम केले नाही.

**न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलट तपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.**

**उलट तपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - २१.०९.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.